| दिनांक 26/03/2025 |
|---|
| **1.** नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/03/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास महिला फिर्यादी या त्यांचे घरातील कामे करीत असताना त्यांचे रुमचा दरवाजा कोणीतरी वाजवला म्हणून त्यांनी दरवाजा उघडला असता दरवाज्याबाहेर उभा असलेला आरोपीत हा घरात आला व त्याने दरवाजा बंद करून दरवाज्याची कडी लावून त्याचेसोबत आणलेला चाकूचा धाक फिर्यादी यांना दाखवून फिर्यादीस शारिरीक संबंधांची मागणी केली व आरडाओरडा केल्यास फिर्यादी यांना चाकूने ठार मारण्याची धमकी देवून त्यांचे ईच्छेविरूदध जबरदस्तीने शारिरीक संबंध केले व झालेला प्रकार कोणाला सांगीतलास तर तुला व तुझे पतीला ठार मारेन अशी धमकी दिली. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक व वेळ 25/03/2025 रोजी 23:24 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.<br>याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं.33/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 64, 351(2)(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास स.पो.नि.श्री.सचिन कुलकणी हे करीत आहेत. |
| **2.** रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/03/2025 रोजी 14:00 वा च्या सुमारास मौजे महिला फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हि अल्पवयीन व अज्ञान असल्याचा फायदा घेवुन दिनांक 24/03/2025 रोजी दुपारी 02.00 वा चे सुमारास कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन संमतीशिवाय फुस लावुन पळवुन नेली.<br>याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं. 36/2025, भारतीय न्याय सहीता 2023 चे कलम 137 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई दगु गंगुर्डे हे करीत आहेत. |
| **3.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 00:15 वा च्या सुमारास मौजे कुंभीवली गावचे हददीत मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर किमी नं 28/800 जवळ येथे आरोपी रा. ओदपुर बस्ती जि आजमगढ उत्त्तरप्रदेश याने त्याचे ताब्यातील ट्रक क्र जी.जे 01 के.टी 3625 हा निष्काळजीपणे व बेकदरकारपणे पुणे ते मुंबई असा एक्सप्रेस वे ने पहिल्या लेनमधुन चालवुन कि.मी. नं 28/800 जवळ आलेवेळी मुंबई बाजुकडे जाण-या ट्रक क्र आर.जे .02.जी.आर .7719 चे मागील बाजुस ट्रक ची ठोकर देवुन अपघात करुन अपघातामध्ये क्लिनर नामे जनकभाई मंडलिक यांस गंभीर दुखापत होवुन त्याचा उपचारा दरम्यान मृत्युस होणेस कारणीभुत झाला. |

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं. 103/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134, भा.न्याय.सं.2023 चे कलम 281,106(1), 125(ब), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/अमित सावंत हे करीत आहेत.

**4.** गोरेगांव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/12/2023 रोजी 00:00 वा ते दि. 06/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे उसरघर गावचे हद्दीत फिर्यादी घरामध्ये, माणगाव येथे आरोपीत यांनी आपसात सगंणमत करून फिर्यादी व साक्षीदार आमची ट्रस्ट असुन गरजु लोकांचे सांन्याचे दागिने तारण घेवुन दोन महिन्याच्या मुदतीकरीता पैसे देते व मुदतीत पैसे न घेता दागिणे परत करते असे सागुन फिर्यादी यांच्या विश्वास संपादन केला त्यामुळे फिर्यादी यांनी टप्याटप्याने त्याचे व नातेवाईकांचे 55.8 तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आरोपीत यांच्याकडे दिले असुन त्याबदल्यात आरोपीत याने फिर्यादी यांना 11,35,000/-रू दिले व आरोपीत याचेकडे सागितले प्रमाणे वारंवार मागणी करून देखील सोन्याचे दागिने परत करता फिर्यादी व साक्षीदार याची आरोपीत क्रं 1 व 2 यानी फसवणुक केली. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र 01 व 02 यांना दिनांक व वेळ 25/03/2025 रोजी 18:44 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत गोरेगांव पोलीस ठाणे गुरनं. 21/2025 भा.दं.वि.क. 420, 406,419,34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई श्रीमंती शितल वाघमारे ह्या करीत आहेत.

**5.** महाड (शहर) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 12:30 वा ते दि. 13/03/2025 रोजी 12:30 वा च्या दरम्यान महिला फिर्यादी रा. राम नगर ठाणे यांचे राहते घरामध्ये मौजे सव ता महाड येथे फिर्यादी यांचे एकूण 2,25,000/- रुपये व किंमतीचे सोन्याचे दागीने पर्स मध्ये ठेवले होते ते कोणीतरी अज्ञामत चोरटयाने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय स्वत:च्या फायदया करीता लबाडीच्या इरादयाने चोरी करून नेले आहे..

याबाबत महाड (शहर) पोलीस ठाणे गुरनं.28/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/अक्षय जाधव हे करीत आहेत.

**6.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/03/2025 रोजी 21:00 वा च्या सुमारास मौजे निबोंडे दांड आदीवासीवाडी ता.खालापुर येथे आरोपीत रा.निबोंडे दांड आदीवासीवाडी ता. खालापुर याने महिला फिर्यादी यांचे घराचे समोर जावुन फिर्यादी व साक्षीदार यांना बाहेर बोलावुन साक्षीदार यांना म्हणाला की तुझे बाबा कुठे आहे असे बोलुन दोघांना शिवीगाळी करुन आरोपीत याने त्याचे घराचे कौल हातात घेवुन फिर्यादी यांच्या डोक्यात उपट मारुन फाईट व लाथा मारु लागला तेव्हा साक्षीदार या फिर्यादी यांना सोडविण्यास आल्या असता त्यांना सुध्दा हाताबुक्कयांनी मारहाण करुन जिवेठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं. 104/2025, भा.न्याय.सं.2023 चे कलम 118(1), 115(2), 352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/ सुभाष म्हाञे हे करीत आहेत.

**7.** महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 00:30 वा च्या सुमारास मौजे दाभोळ खलाटीवाडी राहते घरी, ता महाड येथे कोणीतरी अज़्ञात चोरटयाने महिला फिर्यादी याचे राहते घरात उघडया दरवाज्यावाटे प्रवेश करून घरातील लोंखडी कपाटातील एकूण 06 तोळे 02 ग्रॅम सोन्याचे दागिने व रोक रक्कम असा एकुन 1,74,600/- रुपये किंमतीचा माल कोणीतरी अज़्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमती शिवाय लबाडीने चोरुन नेला.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे गुरनं. 14/2025 भा.दं.वि.क. 305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई .श्री.सदाशिव गायकवाड हे करीत आहेत.

**8.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे कासब गावी किराणा मालाचे दुकानावर, पनवेल येथे आरेपी रा. चावणे याने आपसी वैमनस्यातून कुरापत काढुन फिर्यादी यांना शिविगाळी करून हाताबुक्क्यानी मारहान करुन त्यांच्या चेह-यावर ठोसा मारून तसेच जमिनीवर खाली पाडुन त्यांचे उजव्या हाताच्या पंजावर काठीने मारहान करून त्यांचे हाताचे करंगळीचे हाड फॅक्चर करून दुखापत केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं. 67/2025, बी.एन. एस. 117(2), 115(2),352, 351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सुरेश पवार हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 25.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 197 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,98,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.